दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २६० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२० डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## ग्रामपंचायत निवडणुकीची आज मतमोजणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**रायगड जिल्ह्यात काल पार पडलेल्या १९१ ग्रामपंचायतींच्या मतदानानंतर मंगळवार दि. २० डिसेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ७९.२६ टक्के मतदान झाले आहे. या मतमोजणीबाबत जिल्ह्यात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. एक दिवसाच्या मतदार राजाने आपले बहुमोल मत कुणाच्या पारड्यात टाकले आहे. आणि गावचा कारभारी कुणाला केले आहे हे जाहीर होणार आहे.**



या मतमोजणीसाठी प्रत्येक तालुक्यात मतमोजणीच्या वेळा वेगवेगळ्या देण्यात आल्या आहेत. सर्वप्रथम सर्वाधिक ग्रामपंचायतींच्या निवडणूका असलेल्या महाड तालुक्यात सकाळी ८.३० वाजल्यापासून मतमोजणी सुरु करण्यात येणार आहे.

तर अलिबाग व रोहा तालुक्यात सकाळी ११ नंतर मतमोजणीस सुरुवात होईल. उरण, सुधागड या दोन तालुक्यात सकाळी ९ वाजता तर मुरुड, पेण, पनवेल, कर्जत, खालापूर, माणगाव, तळा, पोलादपूर, म्हसळा आणि श्रीवर्धन या दहा तालुक्यात सकाळी १० पासून मतमोजणी सुरु करण्यात येणार आहे.

मुरुडची मतमोजणी दरबार हॉल, उरणची मतमोजणी सिडको ट्रैनिंग सेंटर बोकडवीरा, पेणची मत मोजणी केईएस हायस्कूल, महाडची मत मोजणी आंबेडकर स्मारक येथे होणार आहे. तर उर्वरित तालुक्यांची मतमोजणी तहसील कार्यालय येथे होणार आहे.

जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींसाठी १६ डिसेंबर २०२२ रोजी निवडणुका जाहीर झाल्या होत्या. अलिबाग ६, मुरुड ५, पेण २६, पनवेल १०, उरण १८, कर्जत ७, खालापूर १४, रोहा ५, सुधागड १४, माणगाव १९, तळा १, महाड ७३, पोलादपूर १६, म्हसळा १३, श्रीवर्धन १३ या तालुक्यातील ग्रामपंचायतीसाठी सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पार पडली. २४० पैकी मुरुड मधील १, पेण २ उरण १, माणगाव ३, महाड २२, पोलादपूर सात अशा ४९ ग्रामपंचायत बिनविरोध झाल्या आहेत.

## हिवाळी अधिवेशनात तान्हुल्यासह आल्या आमदार

### मुख्यमंत्र्यांनी केले कौतुक



**दै.रायगड नगरी । नागपूर**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी आपल्या अडीच महिन्यांच्या बाळासमवेत उपस्थित असलेल्या आमदार श्रीमती सरोज अहिरे यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कौतुक केले आणि दोघा मायलेकांची आस्थेने विच-ारपूसही केली.

विधानसभा सदस्य श्रीमती अहिरे आज अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभागृहात उपस्थित राहण्यासाठी आल्या, त्या आपल्या अडीच महिन्याच्या प्रशंसक या बाळासमवेत. याबाबत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना माहिती मिळताच त्यांनी आमदार सौ. आहेर यांची भेट घेऊन त्यांची आणि बाळाची विचारपूस केली.

विधिमंडळात लोकप्रतिनिधी म्हणून कायदे बनवणे आणि विधिमंडळाच्या बाहेर मातृत्वाची जबाबदारी पार पाडणे, हे निश्चितच आव्हानात्मक आहे. या दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडणे हा स्त्रीमधील कर्तृत्वाचा आणि मातृत्वाचा अनोखा सन्मान असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्याच्या विधिमंडळात पहिल्यांदाच अशी घटना घडत असल्याने त्याबद्दल त्यांचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर कौतुक केले. यावेळी आमदार सरोज अहिरे यांचे पती डॉ. प्रवीण वाघ आणि सासुबाई कल्पना वाघ हे देखील उपस्थित होते.

## प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत पथविक्रेत्यांना कर्ज पुरवठा प्रकरणे मंजूर करण्याच्या महापालिकेडून बँकांना सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रधानमंत्री स्वनिधी योजने अंतर्गत महापालिकेच्यावतीने रूपये दहा हजाराचे पथविक्रेत्यांना भांडवल सहाय्य म्हणून खेळते भांडवल कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. आजवर बँकानी महापालिकेला प्रधानमंत्री स्वनिधी योजना राबविण्यास चांगले सहकार्य केले आहे. यापुढेही संबधित बँकानी प्रधानमंत्री स्वनिधी योजने अंतर्गत राहिलेल्या अर्जदारांना सहकार्य करून त्यांची



कर्जे मंजूर करावे अशा सूचना आयुक्त गणेश देशमुख यांनी उपस्थितांना दिल्या.

**पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पथविक्रेत्यांना व्यवसायाकरीता केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी या अंतर्गत विशेष सुक्ष्म पतपुरवठा योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीकरता नुकतेच बँकाच्या सहकार्याने चारही प्रभागामध्ये विशेष शिबीर राबविण्यातआले. यामध्ये पथविक्रत्यांना एक वर्षाच्या परतफेड मुदतीसह रूपये १०,०००/- (दहा हजार) पर्यंतचे खेळते भांडवली कर्ज घेण्यास आणि त्याची दरमहा हप्त्याने परतफेड करण्यास पात्र असणार आहेत. रूपये १०,०००/- (दहा हजार) परतफेड केल्यास अनुक्रमे रूपये २०,००० (वीस हजार) कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत डिजीटल व्यवहारास प्रोत्साहन देण्यात येत आहे.**

**पंतप्रधान स्वनिधी योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :१)आधार कार्ड २)बँक पासबुक ३) मोबाईल नं. आधारकार्ड नंबरला लिंक पाहिजे ४)रेशन कार्ड / लाईट बिल ५) पासपोर्ट साईज फोटो ६)बाजार फी वसुली पावती**

महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (डेएनयुलएम) विभागाच्यावतीने सर्व बँक प्रतिनिधींची बैठक आज (१९ डिसेंबर) मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात, विविध बँकाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

एमएमआरडिए विभागामध्ये पनवेल महानगरपालिका प्रधानमंत्री स्वनिधी वाटपामध्ये दुसऱ्या क्रमांकावरती आहे. या कामामध्ये बँक अधिकाऱ्यांची भूमिका खूप मोठी आहे. त्यांनी सहकार्य केल्यामुळे पनवेल महानगरपालिका उत्तम प्रकारे काम करू शकली या बद्दल उपायुक्त कैलास गावडे यांनी बँक अधिकाऱ्यांचे आभार मानले. तसेच बँकांकडे पेडिंग असलेल्या केसेसविषयी माहिती देऊन, बँकांनी महापलिकेला सहकार्य करण्याविषयी सूचित केले.

नगरपथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. नगरवासीयांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तु व सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात ते महत्वपूर्ण भूमिका बजावतात. कोविड- १९च्या टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे पथविक्रेत्यांच्या व्यवसायास खेळत्या भांडवलांचा पतपुरवठा तातडीने करण्याच्या उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान स्वनिधी पथविक्रेत्यांसाठी विशेष सुक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने महापालिका क्षेत्रा-तील पथविक्रेत्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जात आहे.

## नोकरी, व्यवसायाच्या नावाखाली फसवणूक प्रकरणी एकाला अटक

**दै.रायगड नगरी । रोहा**

नोकरी, व्यवसायाच्या नावाखाली झालेल्या फसवणूक प्रकरणी एकाला रोहा पोलिसांनी अटक केली आहे, सात महिन्यांपासून फरार असलेल्या या आरोपीचा रोहा पोलीस शोध घेत होतो. एका कार्यक्रमानिमित्ताने सदर आरोपी रोहयात आल्याचे समजताच पोलिसांची त्यास ताब्यात घेतले आहे.


मिनरल वॉटर बॉटलिंगचा व्यवसाय सुरू करण्याच्या ना-वाखाली फिर्यादी पुष्कर गावडे, वडील सदाशिव गावडे रा. रोहा यांची रोहन भेंडे, व अन्य एकाने संगनमताने तब्बल १८ लाख रुपयांची फसवणूक केली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने संबधीत आरोपींवर रोहा पोलीस ठाण्यात ४२०, ३४ प्रमाणे एप्रिल २०२२ रोजी गुन्हे दाखल करण्यात आले. मशिनरी व मटेरियल खरेदी करण्यासाठी इंडियन आयन एक्सचेंज अहमदाबाद गुजरात कंपनीला ऑर्डर दिली. त्यासाठी गावडे कुटुंबियांकडून १८ लाख ४५ हजार ६४० रुपये चेक व एनईएफटीद्वारे घेवून रक्कम इंडियन आयन एक्सचेंज कंपनीत जमा न करता स्वतः च्या फायद्यासठी व्हीआरओ ग्रुप खात्यात जमा केले.

गावडे कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी रोहन भेंडे व अन्य एक यांच्यावर गुन्हे दखल झाले,तब्बल ७ महिने रोहा पोलिसांना गुंगारा देत होता. सर्वो तोपरी प्रयत्न करूनही रोहन भेंडे याचा शोध लागत नव्हता. अखेर शनिवारी महादेववाडी कोलाड येथील नियोजित कार्यक्रमाला भेंडे येणार असल्याची माहिती रोहा पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा लावून उपनिरीक्षक वायंगणकर व सहकाऱ्यांनी आरोपी रोहन भेंडे याला ताब्यात घेतले आहे.

## कर्नाटकची दडपशाही सहन करणार नाही : आ.अजित पवार

**दै.रायगड नगरी । नागपूर**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नी देशाच्या गृहमंत्र्यांनी मध्यस्थी करुनही कर्नाटक सरकारच्या कुरापती सुरुच आहेत. महाराष्ट्रातल्या लोकप्रतिनिधींना बेळगावमध्ये प्रवेशबंदी करुन लोकशाही मुल्ये पायदळी तुडविण्याचे काम कर्नाटक सरकारने केले आहे. यापुढे कर्नाटक सरकारची दडपशाही सहन करणार नसल्याचे सांगत महाराष्ट्र सरकारने सीमा भागातील मराठी भाषिकांच्यामागे ठामपणे उभे राहण्याची जोरदार मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधान सभेच्या सभागृहात केली.



महाराष्ट्रातील नेत्यांना बेळगाव प्रवेशबंदीची मुद्दा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सभागृहात आज उपस्थित केला. यावेळी विरोधी पक्षनेते अजित पवार म्हणाले की, महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमावाद अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. तरीही कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून वारंवार चिथावणीखोर वक्तव्ये केली जात आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सीमावाद उफाळून आला असून दोन्ही राज्यात तणावाचे वातावरण आहे. सीमावादाच्या या प्रश्नी देशाच्या गृहमंत्र्यांनी दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली होती. त्यामुळे या प्रश्नावर योग्य तोडगा निघणे अपेक्षित होते. मात्र ते होताना दिसत नाही. गृहमंत्र्यांच्या बैठकीनंतर सुध्दा कर्नाटक सरकारची मुजोरी कायम आहे असा आरोप त्यांनी केला.

त्याचसोबत बेळगावमध्ये दि. १९ डिसेंबर २०२२ पासून कर्नाटक विधीमंडळाचे अधिवेशन होत आहे. दरवर्षी प्रमाणे महाराष्ट्र एकीकरण समितीने बेळगावमध्ये या दिवशी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या महामेळाव्यासाठी महाराष्ट्रातील काही नेत्यांना आमंत्रित करण्यात आले होते. मात्र त्यांना बेळगावात प्रवेश नाकारण्यात आला आहे. महाराष्ट्रातील कोणत्याच नेत्यांना तेथे जाता येऊ नये यासाठी बेळगावच्या हद्दीतील कोगनोळीसह २१ सीमानाक्यांवर हजारो पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला आहे अशी माहिती अजितदादांनी सभागृहात दिली.

दरम्यान, कर्नाटकने आपली आडमुठी भूमीका कायम ठेवली आहे, दि. १९ डिसेंबर रोजी बेळगावात येण्याची परव-ानगी खासदार धैर्यशील माने यांनी तेथील जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे केली होती. परंतु आपल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे सांगत त्यांना बेळगावात बंदी करण्यात आली आहे. कर्नाटक राज्याची आणि बेळगाव जिल्हा प्रशासनाची महाराष्ट्र आणि मराठी विरा-ेधी भूमीका समोर येत असल्याने मराठी भाषकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे. या दडपशाहीच्या माध्यमातून व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली जात आहे. कर्नाटक सरकारची ही दडपशाही सहन केली जाणार नाही असा इशाराही संतापलेल्या अजित पवार यांनी दिला.

## कर्जत नगरपरिषदेने कर संदर्भात दिलेल्या नोटीसबाबत कर्जतकरांची नगरपरिषदेवर धडक

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११९ (१) (२) अन्वये कर्जत मधील मालमत्ता धारकांना नोटीस पाठविल्या आहेत, या ह्या नोटिशीमुळे कर्जतकरांच्या मनात टॅक्स वाढणार की काय अशा प्रकारची भीती निर्माण झाली आहे त्यामुळे याबाबतची चर्चा कर्जत शहरात तसेच सोशल मीडियावर होताना दिसत आहे कर्जत मधील व्हाट्सआप ग्रुप मधील सदस्यांनी आज दि.१९ डिसेंबर रोजी कर्जत नगरपरिषदेवर धडक मारली व निवेदन दिले.



कर्जत मधील व्हाट्सआप ग्रुप वरील कोंढाणा टाईम्स समुह, वंचित बहुजन आघाडी समुह, कर्जत विकास संघर्ष समिती, दहिवली गाव विचारमंच समुह, महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या समुहांच्या सदस्यांची काल दि.१८ डिसेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीच्या कार्यालयात बैठक घेतली बैठकीच्या अनुषंगाने वाढीव घरपट्टी बाबत चर्चा करून आज दि.१९ डिसेंबर रोजी नगरपरिषद मध्ये चर्चेला जायचे व मुख्याधिकारी यांना देण्याचे ठरले त्याप्रमाणे कर्जतकर सकाळी ११ च्या सुमारास नगरपरिषद कार्यालयात जमले, याठिकाणी विकास चित्ते, प्रभाकर गंगावणे, प्रविण गांगल, अॅड.कैलास मोरे, अॅड.ऋषीकेश जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अॅड.कैलास मोरे यांनी याबाबत आम्हाला मुख्याधिकारी यांच्या समवेत चर्चा करायची मागणी केली मात्र मुख्याधिकारी उपस्थित नसल्याने कर्जतकरांच्यावतीने निवेदन स्वीकारल्या नंतर कार्यालयीन अधिक्षक जितेंद्र गोसावी यांनी दोन दिवसांनी मुख्याधिकारी यांच्या समवेत बैठक बोलावून तुम्ही चर्चा करू शकता असे सांगितले. याप्रसंगी अॅड.प्रसन्न शिंदे, शशांक शेट्टी, सुनिल जाधव, प्रशांत जगताप, हरिश्चंद्र यादव, बळीराम देशमुख, अरविंद मोरे, शिवसेवक गुप्ता, कृष्णा जाधव, दीपक लाड, प्रसन्न बनसोडे, जया म्हसे, प्रशांत उगले, अरुण निघोजकर आदीसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक्स्प्रेसवे वर वऱ्हाडाच्या बसला अपघात; एक ठार, १४ जखमी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर सोमवारी पहाटे सात वाजण्याच्या सुमारास आडोशी उतार येथे वर्हाडाच्या खासगी प्रवासी बसला कंटेनरची जोरदार धडक होऊन अपघात घडला. यात बसचालक संकेत सावंत (वय ३०, रा. डोंबविली) याचा मृत्यू झाला. बसमधील १४ प्रवासी जखमी झाले आहेत यातील तीन जण गंभीर जखमी असल्याने त्यांना तातडीने एमजीएम रुग्णालयात व अन्य किरकोळ जखमींना खोपोली पालिका रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

सिंधुदुर्ग येथून लग्नसोहळा आटोपून हे वर्हाड खासगी बसने शहापूर, वाशिंद येथे परतत होते. या वेळी द्रुतगती मार्गावरील आडोशी उतारावर या बसला पाठीमागून कंटेनरने धडक बसली. बसमध्ये एकूण ३५ प्रवासी होते. जोरदार ठोकर लागल्यामुळे बसचा चालक संकेत सावंत बसमधून बाहेर फेकला गेला व कंटेनरखाली आल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती होताच द्रुतगती मार्गावरील आपत्कालीन यंत्रणा, खोपोली पोलिस तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सक्रिय असलेल्या टीमच्या सदस्यांनी तातडीने मदतकार्य करून जखमींना बसमधून बाहेर काढून उपचारासाठी खोपोली व एमजीएम रुग्णालयात आणले.

या अपघातात मंगल पांगावणे, राजेश होडावडकर, प्रियंका होडावडकर, प्रभाकर ठाकरे, तुषार सावंत, वसंत मुधावाडेकर, रणजित पानगव्हाणे, स्वरा निवेकर, प्रणाली प्रकाश परुळेकर, प्रकाश परुळेकर, पत्रिका ओतूरकर, आकाश दिलीप चौधरी, ताराबाई शांताराम ठाकरे, श्रीशा निवेकर, सर्व रा.अंबरनाथ व नवी मुंबई हे जखमी झाले आहेत.

मुंबई लेनवर दोन्ही अपघातग्रस्त वाहने आडवी झाल्याने जवळपास एक तास येथील वाहतूक पूर्णपणे विस्कळित झाली होती. मदतकार्य पार पडल्यावर आपत्कालीन यंत्रणा व वाहतूक पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.



# नव्या संघर्षाचे रणशिंग

महाविकास आघाडीचे सरकार पडल्याला आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्याला काही दिवसांनी आता सहा महिने होतील. स्वाभाविकच, एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस यांच्या आघाडी सरकारचाही तेवढ्याच काळाचा कारभार पार पडला आहे. या काळात शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने आपला दसरा मेळावा यशस्वी केला असला तरी महाविकास आघाडीने एकत्रित असा प्रभावी राजकीय आवाज उठविला नव्हता. आज नागपुरात विधीमंडळाचे अधिवेशन सुरू होत असताना त्याआधी मुंबईत एकत्रित मोर्चा काढून महाविकास आघाडीने एक राजकीय संदेश दिला आहे. तो काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि इतर छोटे-मोठे विरोधक एकत्र असल्याचा जसा आहे; तसाच नजीकच्या भविष्यात येणाऱ्या निवडणुकांच्या दृष्टीनेही लक्षणीय आहे. हा मोर्चा मुंबईत निघाला असल्याने त्यातील शिवसेनेचे स्थान, बळ आणि महत्त्व सर्वाधिक मोलाचे होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे महामुंबईत फार मोठे बळ नाही. काँग्रेसची संघटना असली तरी तिचे प्रतिबिंब मुंबई महापालिका किंवा लोकसभेच्या निवडणुकांच्या निकालांमध्ये पडलेले नाही. अशा वेळी, महाराष्ट्राच्या राजकारणात ज्या नव्या बेरजा होत आहेत; त्या बेरजांचे प्रतिबिंब प्रत्यक्ष रस्त्यावरच्या संघर्षात उमटते का, हाही कुतूहलाचा विषय होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांचा 'जनुकीय नकाशा' बराचसा सारखा आहे. शिवसेनेचा तो वेगळा आहे. गेल्या काही दिवसांत उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांचाही संवाद होतो आहे. तेव्हा सगळ्याच विरोधकांची मोट शिवसेना बांधू शकते का आणि त्या आघाडीला उद्धव ठाकरे शरद पवार यांच्या बरोबरीने नेतृत्व देतात का, या प्रश्नांची उत्तरेही या मोर्चाशी निगडित आहेत. महाविकास आघाडीने शनिवारचा मोर्चा ठरविल्यानंतर भारतीय जनता पक्षानेही काहीशा घाईने त्याच दिवशी महामुंबईत जागोजागी निषेधाचे कार्यक्रम ठेवले. त्या त्या ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांना हलवून जागे करण्यासाठी व रस्त्यावर आणण्यासाठी त्यांचा उपयोग झाला. तसेच, एका दिवशी दोन वेगवेगळ्या आघाड्यांचे कार्यक्रम झाले, की माध्यमांमधला अवकाश एकाच पक्षाने व्यापला, असे होत नाही. इलेक्ट्रॉनिक व इतरही माध्यमांमधल्या अवकाशात आपल्यालाही शिरकाव करता येतो, हा त्यामागचा उद्देश होता. आघाडीचा मोर्चा आणि भाजपची निदर्शने या दोन्हींची कारणे म्हटले तर सारखी होती. ती म्हणजे महापुरुषांबद्दल कोणी कोणी केलेली विधाने. महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वक्तव्यांबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आधीपासूनच आक्षेप घेत आले आहेत. त्या आक्षेपांना आता गंभीर रूप आले असून 'राज्यपालांना हटवा' या मागणीमुळे विरोधकांनी या संघर्षाला काहीसे टोक आणले आहे. राज्यपाल अलीकडे काहीसे कंटाळले असून निवृत्त होण्यासाठी उत्सुक आहेत, अशा स्वरूपाच्या बातम्या मध्यंतरी येत होत्या. मात्र, आता विरोधकांनी त्यांच्या गच्छंतीची मागणी केली असल्याने स्वाभाविकच हा प्रश्न प्रतिष्ठेचा बनून बसला आहे. तेव्हा, केंद्रीय गृह खाते विरोधकांनी मागणी केली किंवा मोर्चा काढला, म्हणून आता राज्यपालांना निरोप देईल, ही शक्यता कमीच आहे. राज्यपालांनी काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्र्यांना जे पत्र पाठवले, त्यातही आपल्या विधानांचा खुलासा असून मार्गदर्शन करावे, असे म्हटले आहे. त्यात पायउतार होण्याचा मनसुबा नाही. त्यामुळे, या 'अतिविराट' नसला तरी बऱ्यापैकी यशस्वी झालेल्या मोर्चानंतर विरोधक हा संघर्ष विधीमंडळात आणि महाराष्ट्रात इतर ठिकाणी कितपत गांभीर्याने घेऊन जातात, हे पाहावे लागेल. शनिवारच्या मोर्चासाठी शिवसेनेने कंबर कसणे स्वाभाविक होते. याचे कारण, शिवसेनेच्या ताब्यात आता मुंबई महापालिका हे सगळ्यात महत्त्वाचे आणि प्रभावी सत्ताकेंद्र राहिले आहे. ते भविष्यात तसेच राहायचे तर येती महापालिका निवडणूक जेव्हा केव्हा होईल, तेव्हा ती जिंकावीच लागेल. निवडणुका कधी जाहीर होणार, प्रत्यक्षात कधी होणार तसेच मधल्या काळात आणखी काही धक्कादायक राजकीय घडामोडी घडणार का, हे प्रश्न आज अनुत्तरित आहेत. काहीही असले तरी मुंबई महापालिकेची लढाई शिवसेनेला सारी ताकद पणाला लावून लढावीच लागणार आहे. या संघर्षाची तयारी किंवा चुणूक या मोर्चातून दिसली. आजकाल कोणत्याही मोर्चाची आर्थिक गणिते सोपी नसतात. त्यावरून, धुसफूस, नाराजी होण्याचीही शक्यता असते. माणसे जमविण्याचे तंत्र सारेच पक्ष वापरत असतात. शिवसेनेला मुंबईत मोठा भाऊ मानून राष्ट्रवादी, काँग्रेस आणि इतर डावे व सेक्युलर पक्ष साथ देणार का आणि पुढच्या लढाईत उतरणार का, याचेही उत्तर या मोर्चातून सुरू झालेल्या प्रक्रियेत मिळेल. सीमाभागातील काही कार्यकर्तेही या मोर्चात आले होते. या वेळी, 'महाराष्ट्र पेटून उठेल' हा शरद पवार यांनी राज्यपालांच्या वक्तव्यांच्या निमित्ताने या मोर्चात दिलेला इशारा पुढील राजकीय संघर्षाचे सूचन करणारा आहे. तो संघर्ष कसे वळण घेतो, याचे उत्तर आज नागपुरात सुरू होणाऱ्या विधीमंडळाच्या अधिवेशनात मिळेल.

# धाटावनगरीत अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. नारायण वाजे महाराजांच्या किर्तनाने सारेच मंत्रमुग्ध



**दै.रायगड नगरी । धाटाव**


रोहा तालुक्यात धाटावनगरीत किल्ला धाटाव पंचक्रोशी यांच्या माध्यमातून आयोजित वारकरी सांप्रदायाच्या वतीने सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात रात्री हभप नारायण वाजे महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.त्यांच्या किर्तनांने संबंध रोहा तालुक्यातील वारकरी वर्गासह उपस्थित श्रोतेगणही मंत्रमुग्ध झाल्याचे पहावयास मिळाले.

पंढरपूर येथील प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प.श्री नारायण. वाजे महाराज यांनी राष्टसंत जगद्गुरू तुकाराम महाराजांचा माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव,आपणचि देव होय गुरू।।१ पढियें देहभावें पुरवि वासना,अंतीं तें आपणापाशीं न्यावें ।।ध्रु.।।,मागें पुढें उभा राहे सांभाळीत,आलिया आघात निवारावे, योगक्षेम जाणे त्याचे जरी । वाट दावी करीं धरूनियां,तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी हा अभंग कीर्तनासाठी घेतला होता.

आपल्या सुश्राव्य कीर्तनातून त्यांनी अनेक विषयांना स्पर्श करीत ते म्हणाले की अभंग श्रीमद्भगवद्गी येत नाही, अभंग ज्ञानेश्वरीत नाही, अभंग हा गाथेतच आहे. चांगल्या कामासाठी येतो त्याला राजाचं म्हणायचं, भक्त देवाला जसा विसरत नाही, तसा देव भक्ताला विसरत नाही लक्षात ठेवा. देवाने दिलेली संधी कधीही सोडू नका, किती जरी विघ्न आली तरी नामस्मरण नक्की करा, भजन कीर्तन करतो त्याच्यावरच देवाची दृष्यी होते. साधू संतांच्या महाराष्ट्र भूमीत साप्रदायला अधिक महत्व असल्याचे ते म्हणाले. मन हे पाण्यासारखे निर्मळ आहे, मनाला जपा. देव आवडण्यासाठी पुण्य असावे लागते, कोणत्याही देवाची सेवा करा मात्र परमार्थ करा असे सांगून आपल्या दीड तासाच्या कीर्तनात त्यांनी अनेक विनोदी उदाहरणे सांगितली.

या सप्ताह कार्यक्रमात राज्याच्या माजी मंत्री अदिती तटकरे यांनी सुद्धा उपस्थिती दर्शविली.ह.भ.प. नारायण वाजे महाराजांच्या कीर्तनाबरोबरच रात्री आयोजित महाप्रसादाचाही त्यांनी आस्वाद घेतला. दरम्यान दुपारी हभप दिनेश महाराज कडव यांचे प्रवचन झाले. तर रात्री बोरघर व लांडर येथील वारकरी मंडळींनी जागर व वीणापहारा केला.

# मुरुडमध्ये घुमणार पद्मदुर्गचा जागर



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडमध्ये पद्मदुर्ग जागर व संवर्धन समिती आणि कोकण कडा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१५ जानेवारी २०२३रोजी पद्मदुर्ग जागर कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. पद्मदुर्ग जागर कार्यक्रमाचे यंदा १४ वे वर्षे आहे.

यादिवशी सकाळी ६.०० वा.श्री पालखीचे प्रस्थान येथील राधाकृष्ण मंदिर ते जेट्टी सकाळी ७.००वा. ते ९.०० वा. स्वच्छता मोहीम स.१०.०० वा. गडदेवता पूजन सकाळी ११.००वा. ते दुपारी१.०० वा. व्याख्यान व शिवपालखी सोहळा मर्दानी खेळ दुपारी १.००वा. ते २.०० वा. महाप्रसाद दुपारी २.०० वा. पद्मदुर्ग ते मुरुड कडे प्रस्थान.

महाराष्ट्र विधानसभा मुख्य प्रतोदआमदार भरतशेठ गोगावले, अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्र शेठ दळवी,उरण मतदार संघाचे आमदार. महेश बालदी, कोकण कडा मित्र मंडळाचे उपाध्यक्ष संकेत वडके,सचीव ज्ञानेश्वर काकडे, सदस्य नितीन पावले,नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, पद्मदुर्ग जागर समितीचे उपाध्यक्ष संकेत आरकशी,सचीव राहुल कासार, ज्येष्ठ पत्रकार तथा माजी सदस्य मदन हणमंते,बोट व्यवस्थापक बाळा साखरकर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी शिवप्रेमी गडप्रेमींनी अधिक माहिती साठी राहुल कासार - ७०२०१२७९४४ । अनिकेत कदम - ९८५०६१२७२७ यांजकडे संपर्क साधावा..असे पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकूर व कोकण कडा मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार यांनी निमंत्रणाद्वारे कळविले आहे.

# अदानी फाऊंडेशन तर्फे आगरदांडा येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील आगरदांडा ग्रामपंचायतीत अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला परीसरातील ग्रामस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळाला !

आगरदांडा ग्रामपंचायतीच्या सरपंच रुषाली ऋषिकांत डोंगरीकर,सदस्य, समाज अध्यक्ष, दिघी पोर्ट लिमिटेड च्या वतीने चिराग भिमानी मुख्य अभियांत्रिकी तसेच मुंबई येथील तज्ज्ञ डॉ.आर.एन.कुपर दवाखान्यातील तज्ज्ञ डॉ. दया तुपे (शल्य चिकित्सक) डॉ. अन्नु रविंद्र (त्वचा रोग तज्ज्ञ) डॉ. प्रगती नायर (शल्य चिकित्सक) डॉ.अक्षय जेगरकल ( कान नाक घसा तज्ज्ञ), ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलनाने करण्यात आली.

यावेळी प्रामुख्याने मुंबई येथील तज्ज्ञ डॉ.आर.एन.कुपर दवाखान्यातील तज्ज्ञ डॉ. दया तुपे (शल्य चिकित्सक) डॉ. अन्नु रविंद्र (त्वचा रोग तज्ज्ञ) डॉ. प्रगती नायर (शल्य चिकित्सक) डॉ. अक्षय जेगरकल ( कान नाक घसा तज्ज्ञ) या नामांकित डॉक्टरांनी आगरदांडा परीसरातील लोकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

अदानी फाऊंडेशन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे यांनी आपल्या प्रास्ताविकातून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्याची गरज तसेच स्थानिक पातळीवर सेवा मिळू शकेल अशी पर्यायी व्यवस्था करून देण्यात यावी हा एकमेव उद्देश असल्याचे व दिघी पोर्ट लिमिटेडच्या वतीने चिराग भिमानी यांनी सीएसआर उपक्रमांतर्गत अदानी फाऊंडेशन ग्राम विकासासाठी कशाप्रकारे कटिबदध आहोत. यावर आपले मत व्यक्त केले. अदानी समूह बिझनेस विकास करताना नजीकच्या गावाचा सुद्धा विकास करीत आहे. आरोग्य सुदृढ असेल तर कुटुंबीयांना आनंदी राहता येईल. अदानी फाऊंडेशन च्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे सांगितले तर डॉ.दया तुपे यांनी आपल्या योगदानाविषयी मार्गदर्शन केले.याशिबिराचा ७९ जणांनी लाभ घेतला.

यासाठी अंगणवाडी सेविका, औषध पुरवठा विभागाचे नितिन चांदोरकर, ग्रामस्थ मंडळी यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सखी प्राजक्ता आडूळकर, सखी अर्चना कासारे यांनी अथक परिश्रम घेतले.शेवटी अवधुत पाटील अदानी फाऊंडेशनचे अवधूत पाटील यांनी आभार मानले.



# हिरकणीवाडीत आगीत घर भस्मसात



**दै.रायगड नगरी । महाड**

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या हिरकणीवाडी येथे लागलेल्या आगीत संपूर्ण घर भस्मसात होण्याची घटना सोमवारी सकाळी घडली. स्थानिक ग्रामस्थांनी ही आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र अचानक लागलेल्या आगीत हे जुने घर भक्ष्यस्थानी सापडले.

येथे रायबा भागोजी औकीरकर यांच्या जुन्या घराला अचानक आग लागली. आग लागल्याचे समजताच स्थानिक ग्रामस्थांनी ही आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी आले होते. यामुळे रायबा औकीरकर यांचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. घरातील अन्नधान्य, जनावरांचे खाद्य आदीचे मोठे नुकसान झाले.

उपसरपंच गणेश औकीरकर यांनी महसूल विभागाच्या तलाठी कार्यालयाला याची कल्पना दिली. तलाठी महाडिक यांनी याबाबत पंचनामा केला असल्याची माहिती औकीरकर यांनी दिली. रायबा औकीरकर यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याने शासनाने त्यांना आर्थिक सहकार्य करावे अशी मागणी रायगड वाडीतील ग्रामस्थांनी केली आहे.

# कर्जतमधील सात कराटेपटूंची मलेशिया व सिंगापूर मध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्नाटक येथे झालेल्या ९ व्या रेन्बो कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत कर्जत मधील सात कराटे खेळाडूंनी मलेशिया व सिंगापूर येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंनी कर्नाटक येथे १३ पदके पटकावले आहेत. त्यामध्ये ५ सुवर्ण, ४ रौप्य, ४ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत या खेळाडूंनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.

हर्ष बडेकर २ सुवर्ण, तन्वी बडेकर २ रौप्य, सोहम कांबळे २ सुवर्ण, आर्या शेलार एक रौप्य व एक कांस्य, सुजात मोरे एक सुवर्ण, भुषण बडेकर एक रौप्य व एक कांस्य, नरेश बडेकर २ कांस्य पदके पटकावली आहेत. हे सर्व खेळाडू कर्जतमधील म्हाडा कॉलनी मिडलाईन सोसायटी सभागृहात वसंत शेट्टी, नरेश बडेकर, विशाल गायकवाड, भुषण बडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संस्थेच्या अध्यक्षपदी विलास गायकवाड यांची बिनविरोध निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील नावडे गावामध्ये गेली अनेक वर्षापासून सामाजिक कार्य व समाजामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार रुजवण्याचं काम करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संस्थेच्या अध्यक्षपदी विलास गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संस्थेचे विविध कार्यक्रम राबवत समाजाला एकत्र करण्याचं काम विलास गायकवाड हे गेली अनेक वर्ष करत आहे. याची दखल घेऊन संस्थेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करून तरुण वर्गाला एक संधी देण्यात आली आहे. विलास गायकवाड हे अनेक संघटनेमध्ये पदा-वरती काम करत असून त्याचा अनुभव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संस्था वाढवण्यासाठी व तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी कामी येईल असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला

तसेच यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षपदी भीमराव निवृत्ती कांबळे, सचिव सुरेश शिंदे, सहसचिव प्रमोद राजहंस, खजिनदार गोरख अहिरे, सह खजिनदार धर्मेंद्र अहिरे, सल्लागार तानाजी लोखंडे, राजाराम कांबळे, आजिनाथ बनसोडे , रवींद्र मोरे, संघटक सचिन गायकवाड, महिला संघटकपदी नेहा ताई शिंदे, सभासद सविता गायकवाड, नंदाताई कांबळे, चंद्रकांत नरवाडे अनिल खैरे, डॉ अपर्णा गायकवाड व हिशोब तपासणीक पदी संजय गायकवाड यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून गोरगरिबांसाठी काम करून त्यांना न्याय दिला जाईल असे मत अध्यक्ष निवडी दरम्यान विलास गायकवाड यांनी व्यक्त केले.

सिडको शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाने नवी मुंबई प्रकल्पाकरीता पनवेल आणि उरण तालुक्यांतील ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित केलेली आहे अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षणाकरिता सिडको महामंडळाच्या धोरणानुसार विद्यावेतन दिले जाते. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यावेतनाचे अर्ज स्विकारणेची अंतिम तारीख ३०/११/२०२२ होती. परंतु बरेच विद्यार्थी अंतिम तारखेपर्यंत विद्यावेतनाचे अर्ज सादर करू न शकल्यामुळे सिडको प्रशासनातर्फे विद्यावेतनाचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १२/०१/२०२३ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

सबब विद्यावेतनाचे अर्ज अद्यापही सादर न केलेल्या इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, आपले विद्यावेतनाचे अर्ज दि.१२/०१/२०२३ या अंतिम मुदतीत व्यवस्थापक (पुनर्वसन), सिडको लि, बेलापूर रेल्वे स्टेशन, टॉवर नं ७, ७ वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे सादर करावेत. दि.१२/०१/२०२३ नंतर आलेले विद्यावेतनाचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक (पुनर्वसन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३७२/२०२२-२३

## ग्रामपंचायत आकुर्ली
### मु.आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड
### जाहीर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते की, खालील प्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांनी दि.२०/१२/२०२२ ते २५/१२/२०२२ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्यास दिवशी शक्य झाल्यास दि.२७/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

१)

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख | लेखाशिर्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ग्रामपंचायत आकुर्ली हद्दीमध्ये सौरऊर्जा स्ट्रिट लाईट बसविणे. | ७४९९९० | ७४९९ | २०/१२/२२ | २५/१२/२२ | आर.आर.पाटील सुंदर गाव पुरस्कार सन २020/२1 |

अटी/शर्ती
१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२) इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल.
३) निविदा किंमत नापरतावा समजावी.
४) नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
६) निविदा मंजूर केल्यास रु.५००/- चे स्टँम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
७) ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८) इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९) वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रा.पं.ने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
१०) वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

२)

| अ.क्र. | वस्तू/साहित्याचे नाव | लेखाशिर्षक | सन | नग |
|---|---|---|---|---|
| १ | बॅरिकेट खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |
| २ | फोगिंग मशिन खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |
| ३ | प्रोटेबल गॅस कॅरिटेज खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |
| ४ | रबर गतिरोधक खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |
| ५ | लोखंडी बेंच खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |
| ६ | रेलिंग खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |

अटी व शर्ती
१) सर्वात कमी दराने अथवा कोणतेही दरपत्रक मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपचांयतीने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाही.
२) वस्तूचे दरपत्रक ऑफिस वेळेत येवून द्यावे.
३) वस्तूचे दर बाजारभाव प्रमाणे असावे व बाजारभावा पेक्षा जास्त नसावे.
४) दिलेल्या मुदतीत वरुन ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध न झाल्यास आपला दरपत्रक रद्द करण्यात येईल व केलेली मागणी रद्द समजण्यात येईल.
५) साहित्य व वस्तूचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत. प्राप्त दरापैकी कोणतेही एक दरपत्रक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ठेवला आहे.

दि.१९/१२/२०२२

**सही/-**
**सौ.भारती सचिन पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वनवासी कल्याण आश्रम तर्फे मोफत आरोग्य शिबिर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज वनवासी कल्याण आश्रम, पनवेल तर्फे चेरिवली येथे आरोग्य शिबिर घेण्यात आले.

डॉ. आदित्य तेंडुलकर यांनी शिबिरार्थीची आरोग्य तपासणी केली तसेच त्यांना उत्तम मार्गदर्शन केले. शिबिरात स्त्रीया, पुरुष व मुले असे मिळून साधारण ५५ ते ६० जणांनी भाग घेतला. तेथील पाच गावांचे मिळून असलेल्या उपसरपंचांनी सुद्धा हजेरी लावली. डॉक्टरांनी यावेळी योग्य औषधांचे वाटपही केले. तपासणी नंतर प्रत्येकाला पौष्टिक अन्न म्हणून एक एक केळे देण्यात आले. याप्रसंगी अश्विनी मुळे, दत्ता ढोले, सुवर्णा तोंडुलकर हे वकआचे कार्यकर्ते उपस्थित होते. ह्यांनी रूग्णाची वजन, उंची,ताप बघणे, केसपेपर बनवणे, केळे वाटप अशी कामे केली. पांडुरंग बुवा यांनी आधी चेरिवली वाडीतील रहिवाशांना शिबिराची आगाऊ सूचना देऊन ठेवली होती. शिबिरासाठी मेहनत घेणार्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार. डॉक्टर आदित्य यांचे विशेष आभार मानले.

## महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातुन बाथरूम ला जावून येते असे सांगुन एक महिला कोठेतरी निघुन गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

गिता बाबुलाल गौड असे या बेपत्ता महिलेचे नाव असून तिचे वय-५४ वर्षे इतके आहे. तिची उंची पाच फुट, रंग सावळा, केस बारीक काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा मध्यम, अंगात लाल रंगाची साडी नेसली असून तिला भाषा मराठी हिंदी भाषा बोलता येते. तसेच तिला अर्धांग वायुचा झटका आल्याने उजवा हात लुळा पडला आहे.


### PUBLIC NOTICE

**Take notice to the general public On BEHALF OF MY CLIENT Mr.Manish Mulchand Gangar having address B-3 type, Building no.12, Flat No.02, Sector-3, Vashi, Navi Mumbai and M/s Shreeji Life Space Through its partners Mr.Hitesh Devraj Barvadiya and others having address at Shop no.17, Plot no.10, Sector 42 A Seawoods Nerul Navi Mumbai have already purchased from Original allottee and their legal heirs are 1) Shri Krishna Lahu Thakur, 2) Shri Ankush Rama Thakur, 3) Shri Hemant Madhukar Thakur are residing at ViII-Dhuttum, Po-Jasai, Tal-Uran, Dist-Raigad bearing plot no.81, Sector-53 admeasuring area 749.92 Sq Mtr at Dronagiri Node, under CIDCO FILE NO.263. The Agreement to Lease entered and executed on dated 31/01/2022 between CIDCO LTD AND above-mentioned farmers and registered at Uran Sub : Registrar bearing registration no. URAN/465/2022 on dated 11/02/2022. Ane now above-mentioned Farmers willing to Transfer in the name of my client.**

ANY PERSON, Body, Institution etc. have any claim and / or objection in respect of or amongst, or relating to or touching upon the said land described herein above, by way of sale, lease, mortgage, gift, easement, maintenance or otherwise, SHALL communicate the same to the undersigned at his address within 15 days from the publication of this notice, with the documentary evidence in support of thereof FAILING WHICH the client of the undersigned shall complete the transaction deeming the Said Land to be FREE FROM ENCUMRANCES and Claims etc, of whatsoever nature.

Place : Nerul
Date : 19/12/2022

Sd/-
**Adv. Basant Mishra**
RH.NO.19, PUNIT PARK,
PLOT NO.182-C, SECTOR-17
Nerul, Navi Mumbai-400706



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही जमीन मालक / भोगवटादार सौ.भारती सुनील पाटील, पत्ता मु.चावणे, पो.आपटे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे नावे दाखल आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल गंधर्व एंटरप्रायझेस तर्फे भागीदार १) तेजस मनाली पटेल, २) राजेंद्र धर्माजी पाटील, ३) गौरव जयभारत बदानी रा.४ था मजला, एस.एस.खिल्लार बिल्डींग, प्लॉट नं.१३, सेक्टर ३, बेलपाडा खारघर, नवी मुंबई-४१०२१० हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदरहू जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे....

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कराडे खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कराडे खुर्द | ११९ | ४ अ | ००-०९-४०<br>पो.ख. ००-००-००<br>एकूण ००-०९-४० | १.७५ |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तींचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दिवाणी दावा, महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल जमीन मालक / भोगवटादार सौ.भारती सुनील पाटील यांचे बरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.१८/१२/२०२२

सही/-
**ॲड.निलेश मोतीराम पाटील**
**शॉप नं.६, आगरी समाज बिल्डींग, दांडेकर क्लिनीक जवळ, लाईन आळी, पनवेल-४१०२०६**


# माथेरानमधील राजकीय पक्षांना दे धक्का ; शिंदे गटात पक्ष प्रवेशाची मालिका सुरूच

**दै.रायगड नगरी । माथेरान**

बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना शिंदे गटाचा पुन्हा एकदा शिंदे गटाचे माथेरान शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पंचशील नगर मधील युवा नेतृत्व शुभम गायकवाड यांच्या सोबत रामदास सोनावणे, निखिल गायकवाड, प्रतीक पवार, आदित्य बनसोडे, ऋषिकेश सोनावणे, रोहन गायकवाड, अनिकेत गायकवाड, अक्षय बहाद्दूर, सलीम भाई, धीरज वालेंद्र, राजू गायकवाड, संदीप कोळी, प्रतीक नाईकडे, मनीष नाईकडे, संतोष शेलार, सनी जाधव, संतोष गायकवाड, मोहमद खान, असिफ शेख, प्रसाद पवार,अशा असंख्य युवा कार्यकर्त्यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या शिंदे गटात दि.१७ रोजी शिवसेना शाखेत बिनशर्त पक्ष प्रवेश केला. आणि यापुढे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे शुभम गायकवाड व सर्व युवा कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे येथील भीमसैनिकांनी शिवसेनेकडे वाटचाल केली आहे.



यावेळी शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी सगळ्यांचे पक्ष प्रवेश करत शिंदे गटात स्वागत केले. याप्रसंगी माजी नगरसेवक प्रकाश सुतार, संदीप शिंदे, अनिस शेख, अशोक वाघेला, निखिल शिंदे, मयुरेश कदम, अनिकेत जाधव, मयूर चौधरी, गौरंग वाघेला, अमोल चौगुले यांसह शिवसैनिक आणि महिला आघाडी, युवती सेनेच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. यावेळी शुभम गायकवाड म्हणाले की, शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या कामाच्या पद्धतीने आम्ही अक्षरशः भारावून गेलो होतो त्यामुळे आम्हाला त्यांच्या सोबत काम करण्याची प्रबळ इच्छा होती. त्यामुळेच माझ्या शब्दावर विश्वास ठेवून पंचशील नगर मधील युवा वर्ग शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारण्यासाठी शिवसेनेच्या शिंदे गटात डेरेदाखल झाले आहेत. यापुढे आम्ही अगदी निस्वार्थी पणे कसलीही अपेक्षा न ठेवता शिवसेनेचे काम अत्यंत इमानेइतबारे,प्रामाणिकपणे करणार असून नगरपरिषदेवर भगवा फडकविण्यासाठी निश्चितच पुरेपूर प्रयत्न करणार यात शंकाच नाही.

शिवसेनेच्या शिंदे गटात शुभम गायकवाड सारखे निस्वार्थी व्यक्तीमत्व लाभलेले आहे. त्यांनी ज्या ज्या पक्षात काम केले आहे ते अत्यंत प्रामाणिकपणे आणि तळमळीने केलेलं आहे. त्यांच्या सोबत आलेल्या नवोदित शिवसैनिकांना याठिकाणी नक्कीच कामे करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यांच्या प्रत्येक अडचणींवर तोडगा काढण्यासाठी आम्ही सर्वजण सदैव सोबत आहोत.

**प्रकाश सुतार,**
**माजी नगरसेवक शिवसेना**

## पत्रकार मयुर तांबडे यांना कन्याशोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पत्रकार मयुर तांबडे यांच्या कन्येचे नुकतेच निधन झाले आहे.

१८ डिसेंबर रोजी मयुर तांबडे यांच्या नवजात कन्येचे वाडिया हॉस्पिटल, मुंबई येथे नुकतेच निधन झाले आहे.

त्यांच्यावर नेरेपाडा, पनवेल येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. तीचे पुढील सर्व कार्य राहत्या घरी केले जाणार आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : महालुंगी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : महालुंगी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| महालुंगी | पांडुरंग अर्जुन भोईर | १०७ | ०-२४-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-२५-०० | ०.५९ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१८/१२/२०२२

सही/-
**ॲड.महेश भगत**
**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९३२३६६७३७८**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्रीमती.मालती नारायण देशमुख यांच्या खुद्द मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील मौजे : तोरणगाव, ता.सुधागड, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तोरणगाव, ता.सुधागड, जि.रायगड येथील**

| सर्व्हे क्र. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २३/३/अ | १-४३.०० पैकी<br>०-२०.०० | ०.३२ |

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्रीमती.मालती नारायण देशमुख यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दि.१७/१२/२०२२

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु.पो.पाली भोईआळी, ता.सुधागड, जि.रायगड-४१०२०५**
**मोबाईल नं.८४८३९९४३४३**


## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समिती, रायगड जिल्हा तर्फे सेवा रथयात्रेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती, रायगड जिल्हा यांच्यातर्फे सुवर्ण महोत्सवी वर्ष १९७३ ते २०२३ निमित्ताने सेवा रथयात्रेचे आयोजन मंगळवार दिनांक २० डिसेंबर २०२२ ते मंगळवार दिनांक २७ डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील रोहा, पाली, माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, मुरुड या तालुक्यांमध्ये ही सेवा रथयात्रा फिरणार आहे.

संस्कार, शिक्षण, स्वावलंबन, आरोग्य, कृषी पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन व पूर्वांचल विकास इत्यादी सेवा कार्याचे प्रमुख आयाम आहेत. समितीमध्ये रोहा, नागोठणे, महाड, पाली या ठिकाणी किशोरी विकास वर्ग चालविले जातात. तर रोहा येथे संस्कार वर्ग चालविले जातात. महाड येथे फिरती विज्ञान प्रयोगशाळा कार्यरत असून, ग्राम आरोग्य रक्षक ११३ आदिवासी वाड्यांमध्ये कार्यरत आहेत. या रथ यात्रेच्या निमित्ताने ५० किलोमीटर परिक्रमा व पन्नास हजारापर्यंत जनसंपर्क साधण्याचे ध्येय समोर ठेवण्यात आले आहे.

मुंबईसारख्या महानगरामध्ये माता बाल आरोग्य आहार प्रकल्प चालविण्यात येतो. त्याचप्रमाणे महाड, चिपळूण, कोल्हापूर, केरळ या ठिकाणी कोरोना आपत्ती व महापुराच्या वेळी समितीकडून सेवाकार्य राबविण्यात आले. तर पूर्वांचल छात्रालय चिपळूण, डोंबिवली, नाशिक, पुणे, सांगली, संभाजीनगर व लातूर या ठिकाणी कार्यरत आहे. या सेवा रथयात्रेचा प्रारंभ रोहा येथून होऊन पाली, माणगाव, पोलादपूर, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा, मुरुड या ठिकाणी फिरल्यानंतर पुन्हा रोहा येथे समारोप होणार आहे.


मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.अस्मिता भुवड

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दिवाणी एम.ए.१८३१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०१/२०२३

१) श्रीमती.रवींद्र जगन्नाथ भोईर
वय : ५९ वर्षे, व्यवसाय : काही नाही
रा.मुक्काम जुई पो.कामोठे, रायगड
२) श्री.जयंत जगन्नाथ भोईर
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.वरील प्रमाणे
३) श्रीमती.पदमाबाई जगन्नाथ भोईर
वय : ७७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.वरील प्रमाणे
४) सौ.रजनी हनुमान म्हात्रे
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.दिपसागर, सेक्टर १८, नेरूळ ........ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

१) ज्याअर्थी हे दि.१/१०/२०२१ रोजी जगन्नाथ मंगळ्या भोईर यांचे क्रिटीकेअर लाईफलाईन हॉस्पिटल कामोठे पनवेल कोविड साथीमुळे मृत्यू झाला. मृत्यूसमयी त्यांचे वय ८२ होते.

२) जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांचे मृत्यूनंतर त्यांची पत्नी व मुले हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांची आई पदीबाई मंगळ्या भोईर यांचे निधन सन २६/६/१९९६ रोजी जुई कामोठे येथे झाले.

३) अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ हे मयत जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांचे मुलगे आहेत. अर्जदार क्र.३ श्रीमती.पदमाबाई जगन्नाथ भोईर ही मयत जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.४ ह्या मयत जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांची विवाहित मुलगी आहे. मयत जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांची आई पदीबाई मंगळ्या भोईर ह्या मयत आहेत.

४) मयत जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांना अर्जदार क्र.१ ते ४ ह्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार क्र.१ ते ४ यांनी सदरील दिवाणी चौकशी अर्ज मयत जगन्नाथ मंगळ्या भोईर ह्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर बाबत कोणालाही हरकत असेल अथवा त्या संदर्भात जर कोणतीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात व्यक्तीशः अथवा वकीलांसोबत हजर होवून हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न घेतल्यास अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल.

ही नोटीस आज रोजी दि.१६/१२/२०२२ रोजी माझ्या सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


## दि.२९ डिसेंबर रोजी होणार डाक अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड डाक विभागातील टपाल सेवेसंदर्भात तक्रार/समस्या निवारण करण्यासाठी अधीक्षक डाकघर, अलिबाग कार्यालयात गुरुवार, दि.२९ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगड विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार/समस्यांचे निवारण सहा आठवडा कालावधीत झालेले नाही, अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनिऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारीत दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली, त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इत्यादी सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे.

इच्छुक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतीत अधीक्षक डाकघर रायगड विभाग,अलिबाग येथे दि.२८ डिसेंबर २०२२ पर्यंत पोहचेल अशा रितीने पाठवावी, असे आवाहन अलिबाग डाकघर अधीक्षक श्री.डॉ. संजय लिये यांनी केले आहे.


मा.गोडसे साहेब

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

दि.चौ.अर्ज १८४३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०१/२०२३

१) श्रीमती.रमा उर्फ रमाबाई बाळाराम गोंधळी
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रेमजीत बाळाराम गोंधळी
वय : २६ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.प्रथमेश बाळाराम गोंधळी
वय : २४ वर्षे, धंदा : शेती
१ ते ३ सर्व रा.सेक्टर-१४, मु.पो.कामोठे गाव, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.प्रिती सुजित म्हात्रे
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड ........ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. सदर अर्जदार क्र.२ व ३ हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून अर्जदार क्र.४ ही त्यांची बहिण आहे. सदर अर्जदार क्र.१ चे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील बाळाराम धर्मा गोंधळी हे दि.०७/१२/२०११ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे मयत झालेले आहेत. सदर मयत बाळाराम धर्मा गोंधळी यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : कामोठे, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि. यांनी संपादीत केलेल्या असून सदर मिळकतीच्या संपादनापोटी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आलेले आहे. सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

**अ) संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामोठे २२३ | ४८ | २ | ०-०१-० | ०.६ |
| | | ४८ | ४ | ०-०६-३ | ०.८० |
| | | ६८ | २२ | ०-०८-० | ०.२५ |
| | | ६८ | २६ | ०-०१-० | ०.३ |
| | | ७० | १ | ०-१६-० | ०.५० |
| | | ७० | ६ | ०-०५-३ | ०.२२ |
| | | ७० | १४ | ०-१२-६ | ०.५० |
| | | ७० | १५ | ०-१-० | ०.३ |
| | | ७० | १६ | ०-२-५ | ०.९ |
| | | ७१ | १ | ०-१५-२ | ०.९१ |
| | | ७२ | १ | ०-२-० | ०.१६ |
| | | ७२ | २ | ०-११-० | १.६२ |
| | | ७२ | ४ | ०-१७-८ | १.८८ |
| | | ७६ | ६ | ०-२-५ | ०.३४ |
| | | ११८ | ८ | ०-१७-७ | २.६९ |
| | | ५४ | २+४+६+७+९ | ०-९०-१ | ९.७५ |
| २ | कामोठे १३१ | १९८ | १ बी | ०-१८-० | २.१३ |
| | | २०२ | १ ए | ०-२४-४ | ३.०७ |
| | | २ | २ | ०-८-६ | १.१२ |
| | | ३ | ५ | ०-५-६ | ०.१२ |
| | | ६ | २-ए/१ | ०-५-८ | ०.१२ |
| | | ४५ | ७ | ०-६-६ | ०.५० |
| | | २०४ | ५ | ०-६-३ | ०.७८ |
| | | ३६७ | ४ | ०-२-८ | ०.३७ |
| | | १८० | ४ | ०-१-८ | ०.१९ |
| | | १८२ | ६ | ०-२७-० | ४.२५ |
| | | १९० | १+२ | ०-४-९ | ०.६२ |
| | | १९३ | २ ए | ०-११-१ | १.६२ |
| | | १९४ | २ | ०-२१-७ | २.४९ |
| | | १९४ | ३ | ०-१८-७ | ३.९४ |
| | | ७ | ४ | ०-१२-१ | २.५६ |
| | | ३९बी | ४ | ०-७२-८ | ०.६ |
| ३ | कामोठे २२३/३ | ७५ | ४ | ०-५-१ | ०.७२ |
| | | ७५प | ९ | ०-०६-० | ०.८८ |
| | | ७५ | १७ | ०-५-० | ०.८१ |
| | | ८० | ४ | ०-१-० | ०.१६ |
| | कामोठे २२३/१ | ८३ | ९ | ०-७-३ | १.३७ |
| | कामोठे २२३ | ७५ | १० | ०-०२-५ | ०.४४ |

ब) त्याचप्रमाणे मयत बाळाराम धर्मा गोंधळी यांच्या नावे पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत मौजे : कामोठे गाव, ता.पनवेल येथे घर मिळकत असून तिचा इमारत क्रमांक ६४६, जुना मालमत्ता क्रमांक ११६/२/ब असा आहे.

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत बाळाराम धर्मा गोंधळी यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड व इतर सर्व लाभ तसेच घर मिळकतीच्या असेसमेंट सदरी अर्जदारांच्या नावांवर नोंद होण्याकरिता अर्जदारांनी ते मयत बाळाराम धर्मा गोंधळी यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदारांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१९ माहे डिसेंबर सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## सेल्स ऑफिसमधून दोन मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील पळस्पे येथे असलेल्या पॅराडाईज ग्रुपच्या साई वर्ल्ड सिटी इमारतीचे सेल्स ऑफिसमधून दोन मोबाईलची चोरी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पळस्पे येथे असलेल्या पॅराडाईज ग्रुपच्या साई वर्ल्ड सिटी इमारतीचे सेल्स ऑफिसमधील टॅबरूमच्या काचेच्या विंडोमधून आत सेल ऑफीसमध्ये प्रवेश करून अज्ञात इसमाने १२ हजार रुपये किमतीचे एमआय कंपनीचे दोन मोबाईल चोरी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरला जातो असे सांगुन एक इसम घरातून निघुन मात्र परत घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

ज्ञानेश्वर सरनेश हाजारे असे या बेपत्ता इसमाचे नाव असून त्याचे वय ४० वर्षे, रंग सावळा, उंची ५ फुट ४ इंच, बांधा – मध्यम, केस – काळे व कुरळे, मिशा – बारीक, अंगात क्रिम रंगाचा फुल शर्ट व काळ्या रंगाची फुल पॅण्ट तसेच पायात स्लिपर घातलेली आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र.०२२-२७४५२३३३ किंवा पो.ना. एम एस पाटील यांच्याशी संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# तिरंगा पतपेढीचा आदर्श इतर पत पेढीने घ्यावा : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर गावातील तिरंगा पतपेढी ही समाजामध्ये खूप चांगल्या प्रकारे सामाजिक कार्य करत आहे. आपल्या पत पेढीतील खातेदारांना व सभासदांना स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी कर्ज स्वरूपात मदतीचा हात पुढे करत असून सभासदांच्या मृत्यूनंतर ही त्यांच्या वारसानां आर्थिक मदतीचा हात देत आहेत. त्यामुळे अशा तिरंगा पत पेढीचा आदर्श इतर पत पेढीने घ्यावा असे प्रतिपादन काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी व्यक्त केले.



तिरंगा पत पेढीच्या वतीने या हि वर्षी खातेदारांसाठी, सभासदांसाठी व हितचिंतकांसाठी २०२३ वर्षातील कॅलेंडर छापून सदर कॅलेंडरचे प्रकाशन काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी सांगितले की राजकीय पादुका बाहेर ठेवत या पत पेढीचे सभासद परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, तलई (महाड) पूरग्रस्तांना मदत, कोरोना मध्ये अनेक दिन दुबळ्यांना गरजूंना मदत या सारख्ये उपक्रम राबवित आहेत.

त्याच बरोबर तिरंगा पत पेढीच्या सभागृहाला काँग्रेसचे दिवंगत नेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री गोरगरिबांचे कैवारी बॅरिस्टर ए आर अंतुले साहेबांचं नाव देणे ही खूप मोठी गोष्ट तिरंगा पतपेढीच्या वतीने करण्यात आली त्याबद्दल तिरंगा पत पेढीच्या सभासदांचा निश्चित माझ्या सारख्या कार्यकर्त्याला अभिमान वाटत आहे. असे गौरवोद्गार महेंद्रशेठ घरत यांनी काढून तिरंगा पत पेढीला शुभेच्छा दिल्या


याप्रसंगी तिरंगा पतपेढीचे चेअरमन अलंकार परदेशी, व्हाईस चेअरमन सुनील नारंगीकर, संचालक सुधीर केणी, रविंद्र म्हात्रे, बी सी ठाकूर, घनश्याम पाटील, विकास म्हात्रे, मॅनेजर जगदीश ठाकुर, कॅशियर राजेंद्र भगत, कर्मचारी चंद्रकांत गोंधळी, पिग्मी एजंट सचिन घबाडी, विश्वास मोकल, किरण कुंभार व काँग्रेस कार्यकर्ते जगन्नाथ म्हात्रे व अमर म्हात्रे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# पुनर्वसित निडी गावातील वीजवाहिन्या जीर्ण झाल्याने नागरिकांच्या जिवितास धोका

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

येथील अंबा नदीला १९८९ मध्ये आलेल्या महापुरामुळे बाधीत झाल्याने पुनर्वसन झालेल्या नागोठण्याजवळील निडी गावातील वीज वाहिन्या जिर्ण झाल्या आहेत. त्यामुळे या वीज वाहिन्या वारंवार तुटत आहेत. गावातील एक रहिवासी संतोष मढवी यांच्या घरावर तीन वेळा वीजवाहिनी तुटून पडली आहे. त्यामुळे भविष्यात जिवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे एखादी दुर्घटना होण्याआधी वीज वितरण कंपनीने गावातील विजवाहिन्या संपूर्णतः बदलून नव्याने टाकाव्यात अशी मागणी बाळासाहेबांची शिवसेना गटाचे उपविभाग प्रमुख आकाश मढवी यांनी एका निवेदनाद्वारे वीज वितरण कंपनीकडे केली आहे.

सद्य स्थितीत निडी गावातील वीजवाहिन्यांचे काम शनिवार दि. १७ डिसेंबर रोजी जुन्याच वीज वाहिन्यांना जोड देऊन तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आले आहे. मात्र या वीजवाहिन्या पुन्हा कधीही कोसळतील अशा अवस्थेत आहेत. तसेच यामुळे गावातील वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याच्या घटनाही घडत आहेत. गावात वीजदुरूस्तीच्या कामात वीजकर्मचा-यांनाही अनेक तांत्रिक अडचणी येत असल्याने हा वीजपुरवठा सुरळीत होण्यास तासनतास लागत असतात. त्यामुळे नागरिकांना दिवसा तसेच रात्रीच्या वेळेस तर अनेक समस्यांना व त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वीजवितरण कंपनीने यावर त्वरीत उपाययोजना करावी अशी मागणीही आकाश मढवी यांनी केली आहे.





# महिला उद्योजिकांकरिता दि.२३ डिसेंबर रोजी होणार वस्तू विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ई.डी.आय.आय.)द्वारा आयोजित व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई द्वारा पुरस्कृत उदया प्रकल्पांतर्गत अलिबाग समुद्र किनाऱ्याशेजारील मैदान येथे दि.२३ डिसेंबर ते दि. २५ डिसेंबर २०२२ या कालावधीत उदया प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगार निर्माण केलेल्या महिला उद्योजकांकरिता 'स्वयंसिद्धा 'वस्तू विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि.२३ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ११.०० वा. अलिबाग समुद्र किनाऱ्याशेजारील मैदान येथे होणार आहे.

भारतीय उद्योजकता विकास संस्था द्वारा रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या तीन वर्षापासून टाटा कम्युनिकेशन्सच्या पुरस्कृततेने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच बचतगटातील महिलाकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले होते. या प्रशिक्षणातून प्रेरित होऊन महिलांनी आपले व्यवसाय सुरु करून स्वयंरोजगार निर्माण केले आहेत. या उद्योजकाच्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी, तसेच त्यांच्या वस्तूची जाहिरात व्हावी, या उद्देशाने वस्तू विक्री व प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायित्व विभागांतर्गत रायगड व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये उदया प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण हा मुख्य उद्देश असून या माध्यमातून जास्तीत जास्त स्वयंरोजगार निर्माण होवून उत्पन्नाचा आर्थिक स्त्रोत निर्माण व्हावा, भारतीय उद्योजकता विकास संस्था, अहमदाबाद ही राष्ट्रीय स्तरावर उद्योजकता प्रशिक्षण, शिक्षण या क्षेत्रामध्ये गेल्या चाळीस वर्षापासून कार्यरत आहे. संस्थेचे प्रकल्प कार्यालय अलिबाग येथे आहे.

या प्रदर्शनाला भेट देवून महिला तसेच दिव्यांग उद्योजक यांचा आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन भारतीय उद्योजकता विकास संस्था व टाटा कम्युनिकेशन्स यांच्या वतीने संस्थेचे प्रकल्प संचालक डॉ.प्रकाश सोलंकी यांनी केले आहे.

# श्रम संस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकास साधावा : संतोष पाटील

### शिघ्रे -नवीवाडी येथे वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच श्रमाचे महत्त्व समजून चांगले संस्कार व्हावेत.यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा स्तुत्य उपक्रम असून श्रम संस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपला व्यक्तिमत्त्व विकास साधावा. असे प्रतिपादन मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या शिघ्रे-नवीवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजना आयोजित सात दिवसीय श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष पदावरून बोलताना सरपंच संतोष पाटील यांनी केले.





यावेळी वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए. नगरबावडी, उपप्राचार्य डॉ.विश्वास चव्हाण, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शिवप्रसाद रोडगे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष माळी, दिलिप ठाकूर, बाळकृष्ण मिसाळ, गोविंद मिसाळ, सखाराम बेडेकर, बाळकृष्ण बेडेकर, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. एस.एस.भैरगुंडे, प्रा.डॉ.जी.डी.मुनेश्वर, डॉ. सीमा नाहीद, प्रा.डॉ.मधूकर वेदपाठक,प्रा. डॉ.जे.के.कांबळे, मंदार सावंत, स्नेहा चव्हाण, सृष्टी पाटील, संदीप बोरले विद्यार्थी प्रतिनिधी, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर.अंतुले यांनी महाविद्यालयाच्या माध्यमातून मुरुडमध्ये शिक्षणाचे दालन खुले करून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली. विद्यार्थ्यांना श्रम संस्काराचे महत्व कळावे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत आहेत. त्याचाच भाग यंदा या योजनेअंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास हे ब्रिद घेऊन शिघ्रे-नवीवाडी येथे दि.१७ ते दि.२३ डिसेंबर या कालावधीत सात दिवसीय श्रम संस्कार शिबिर आयोजित करून यामध्ये स्वच्छता मोहिम, ग्राम सफाई, वनराई बंधारा, आधार कार्ड, मतदार नोंदणी, सर्वे आदी. उपक्रम घेण्यात येत असल्याचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.एस.एस.भैरगुंडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी एम.पी. एस.सी, यु.पी.एस.पी.या परीक्षेत प्राविण्य मिळवून प्रशासकीय सेवेत यावे. अशी भावना प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शिवप्रसाद रोडगे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैष्णवी राजपूरकर हिने तर रिया माने हिने आभार मानले.

# म्हसळा तालुक्यात एकूण ६४.११% मतदान

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात संपन्न झालेल्या १३ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत ७ ग्रामपंचायतीच्या निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत, तर रविवारी दि. १८ रोजी सहा ग्राम पंचायतीमध्ये सरपंच आणि सदस्य पदासाठीची निवडणूक पार पडली. बिनविरोध ७ ग्रामपंचायती पैकी ४ ग्राम पंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसने एकहाती सत्ता मिळवत सरशी घेतली आहे, तर दोन ग्राम पंचायतीमध्ये शिवसेना-उद्धव ठाकरे गटाचे वर्चस्व राहीले आहे. उर्वरित ६ ग्रामपंचायतींमध्ये सरपंच आणि सदस्य पदासाठी निवडणूक झाली असल्याने सहा सरपंचांसह अनेक ग्रामपंचायत सदस्यांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे.म्हसळा तालुक्यात एकूण ६४.११% मतदान झालेले असून एकूण ६१४३ मतदारांपैकी ३९३८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

तालुक्यातील काळसुरी, रेवली, कणघर, फळसप या ४ ग्राम पंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता प्रस्थापित होणार आहे तर कांदलवाडा आणि निगडी या ग्राम पंचायतीमध्ये शिवसेना-ठाकरे गटाची सत्ता प्रस्थापित होणार आहे. तसेच खरसई ग्रामपंचायतमध्ये खरसई विकास आघाडी म्हणून बिनविरोध घोषित करण्यात आली आहे.तालुक्यातील संदेरी, घोणसे, देवघर, लेप, तोंडसुरे, तोराडी या ग्रामपंचायतीमध्ये काही ठिकाणी सरपंच व सदस्य पदासाठी निवडणूक झालेली आहे. निवडणूक झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये काही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना शिंदे गट यांच्यात जोरदार रस्सीखेच झालेली पहायला मिळाली. तर काही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी एकमेकां विरोधात निवडणूक लढवीत होते.

६ थेट सरपंच पदासाठी १४ अर्ज दारवल आहेत.त्यामध्ये घोणसे सरपंच पदाचे आरक्षण सर्वसाधारण गटासाठी असून १) कानसे रमेश धोंडू,२) पवार सतिश रामनाथ ३) रमण शांताराम खेडेकर यांच्यात लढत आहे. देवघर ग्रामपंचाय तीत सरपंच पदाचे आरक्षण ना.म. प्र, (स्त्री) गटासाठी राखीव असून १) गीजे ज्योती विनायक २)गिजे मनिषा महेंद्र ३) पोटले सौजन्या सुजित यांच्यात लढतआहे.तोराडी सरपंच पदाचे आरक्षण अनुसूचित जमाती राखीव असून १)पवार गुलाब अरविंद आणि २) पवार गुलाब संतोष यांच्यात लढत आहे.संदेरी सरपंच पदाचे आरक्षण ना.म. प्र,(स्त्री) आहे. १)पाटेकर रिया नितेश आणि २)पाष्टे शुभांगी विलास यांच्यात लढत आहे. लेप सरपंच पदाचे आरक्षण सर्वसाधारण (स्त्री) आहे तेथे १)शिगवण स्नेहा संजय २) शुभांगी सुधाकर चाळके यांच्यात लढत आहे.तोंडसुरे सरपंच पदाचे आरक्षण ना.म. प्र.पुरुष आहे .तेथे १) महाडीक सुरेश भिकू २) नाक्ती मोहन हिराचंद यांच्यात थेट लढत आहे. विविध राजकीय पक्षांसाठी स्थानिक स्वराज संस्थांचे निवडणूकी साठी ही निवडणूक महत्वाची आहे.तालुक्यांत राष्ट्रवादी काँग्रेसकडे खासदार, आणि दोन आमदार असे विकासाचे भक्कम नेतृत्व आणि तालुक्यांत जिल्हा- तालुका पातळीवरील नेते आणि कार्यकर्तांची मजबूत फळी आसल्याने ग्रामपंचायत निवडणूकांतून यश राष्ट्रवादी काँग्रेसकडे झुकत आहे.



# शालेय आठवणींमध्ये हरवले माजी विद्यार्थी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शालेय जीवनात खरे तर अभ्यासक्रम करतांना खूपच कंटाळवाणा यायचा नेहमीचाच तो गृहपाठ आणि अभ्यास करताना पुस्तकांचा कंटाळा, शिक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे देताना जर का अभ्यास केला नसेल तर छडीचा मार खावा लागत होता. कधी एकदाच ह्या त्रासातून मुक्ती मिळते असेच वाटायचं आपले शिक्षण लवकर पूर्ण होउदे मग आराम करू असेही मनोमन वाटायचं पण आता तेच बालपण पुन्हा एकदा मिळावे असे वाटायला लागले आहे कारण जी मजा जो आनंद शालेय जीवनात असतो तो कुठेही सापडत नाही. ते जुने मित्र,मैत्रिणी यांच्यासोबत केलेली थट्टा मस्करी, वर्षातून एकदा कुठेतरी जवळपास शालेय सहल काढली जायची त्यात आपण स्वतःहून केलेला स्वयंपाक शिक्षकांना देऊन आपल्या गटाला किती मार्क मिळतात याची उत्सुकतेने वाट पहायची. वार्षिक स्नेहसंमेलनात भाग घेऊन आपली कला सादर करण्यात जो काही आनंद मिळायचा तो शालेय जीवना नंतर पुढे स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर विरून गेला आणि भविष्यात काहीतरी नवीन करण्यासाठी जी काही धडपड सुरू झाली त्यात सर्वकाही गर्द धुक्याप्रमाणे दिसेनासे झाले होते. परंतु नुकताच दोन दिवस शालेय स्नेहसंमेलन पार पडले त्यात सर्व मित्र मैत्रिणी एकाच व्यासपिठावर आल्याने जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सर्व माजी विद्यार्थी आतुरलेले दिसत होते.



सन १९५०/५५ मध्ये त्याकाळी इथल्या स्थानिक नागरिकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळेत चौथी पर्यंत शिक्षण घेतल्यावर पुढील शिक्षणासाठी काहीच पर्याय उपलब्ध नव्हता त्यासाठी शिक्षण महर्षी स्व. बाबासाहेब गव्हाणकर यांनी इथली भौगोलिक परिस्थिती पाहून सन १९६९ साली सरस्वती विद्या मंदिर ही दहावीपर्यंत शाळा सुरू केली आणि इथे खऱ्या अर्थाने शिक्षणाची गंगा आणली.त्यामुळेच आज ह्या दुर्गम भागात अनेक विद्यार्थ्यांना आपल्या पायावर उभे राहता आले आहे.

अनेकांनी विविध क्षेत्रात आपले करियर निर्माण केले आहे. कुणी शैक्षणिक क्षेत्रात तर कुणी सामाजिक, राजकीय क्षेत्रात सुध्दा आपला ठसा उमटवला आहे. इथला सर्वसामान्य विद्यार्थी आज उच्चपदावर आहे ते केवळ शिक्षण महर्षी बाबासाहेब गव्हाणकर यांच्या शाळेमुळेच. मागील काही वर्षात गव्हाणकर ट्रस्ट या शाळेची इमारत मोडकळीस आल्यामुळे काही वर्ग हे नगरपरिषदेच्या शाळेतील अन्य वर्गात भरवले जातात. परंतु जुनी शाळा ही सर्व माजी विद्यार्थ्यांना नेहमीच खुणावत होती त्यासाठी जवळपास चार दशकानंतर काही माजी विद्यार्थ्यांनी शाळेचे विश्वस्त दादासाहेब गव्हाणकर यांच्याकडून मार्गदर्शन घेण्यासाठी शालेय पोशाख परिधान करून वर्गातील बाकांवर बसून माहिती घेत होते तर काहींनी शाळेच्या मैदानावर कवायती सुध्दा करून आपल्या शालेय जीवनातील बालपणीच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

> सरस्वती विद्या मंदिर ही सर्वांची जुनी शाळा दुरुस्तीचे कारण पुढे करून बंद केली आहे की काय असाच प्रश्न नागरिक, पालक माजी विद्यार्थी नेहमीच विचारत होते यासाठी आम्ही शाळेचे विश्वस्त शशिभूषण गव्हाणकर यांच्याकडे याबाबत सविस्तर चर्चा केली असता त्यांनी ही आपली शाळा पुन्हा एकदा आपल्या सर्वासाठी येत्या २६ जानेवारी रोजी झेंडावंदन झाल्यावर २७ जानेवारी पासून सुरू करणार आहोत असे आश्वासन दिले आहे.
>
> **सुरेश शिंदे, माजी विद्यार्थी**

# तळा ज्युनियर कॉलेज व हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत मारली बाजी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठमहाविद्यालय आणि गो म वेदक विद्यामंदिराच्या विध्यार्थ्यांनी कुस्ती व क्रिकेट स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे मुंबई विभाग स्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२२ टाटा स्टील लिमिटेड खोप-ोली, टाटा कॉलनी स्पोर्ट्स हॉल इसंबा फाटा खालापूर येथे दिनांक १५ डिसेंबर ते १७ डिसेंबर,२०२२ या दरम्यान १९ वर्ष वयोगटातील कुस्ती स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने बाजी मारली आहे.



ग्रिको रोमन कुस्ती प्रकारात मुनावर अकलक खाचे यांनी ९७ किलो वजनी गटात प्रथम, साहील संजय लोखंडे या विद्यार्थ्याने ६३ किलो वजनी गटात द्वितीय, शुभम विनायक रसाळ ८७ किलो वजनी गटात द्वितीय, तर फ्रिस्टाईल कुस्ती प्रकारात सुजल विनायक रसाळ या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या सर्व विध्यार्थ्यांना प्रा. कसबे पी पी व प्रा. मचे एन टी यांनी मार्गदर्शन केले होते.

तसेच दिनांक १२ डिसेंबर ते १७ डिसेंबर २०२२ या दरम्यान गुरुकुल इंटरनॅशनल चौक, ता खालापूर येथे पार पडलेल्या रायगड जिल्हा स्तरीय शालेय सिजन क्रिकेट स्पर्धा १७ वर्ष वयोगटात गो म वेदक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना श्री महाडकर व्ही एल यांनी मार्गदर्शन केले होते. मार्गदर्शक शिक्षक व नेत्रदिपक यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे सर्व विश्वस्त, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरूषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन महेंद्र कजबजे संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.